**गोवर-रुबेला लसीकरण मोहिमेचा डॉ. कोलीन स्कॉट यांनी घेतला आढावा**

ठाणे दि 3 डिसेंबर 2018 : आंतरराष्ट्रीय रोग नियंत्रण संघटनेच्या उच्चस्तरीय अधिकारी डॉ. कोलीन स्कॉट यांनी आज ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात सुरु असणाऱ्या रुबेला लसीकरण मोहिमेच्या प्रत्येक्ष ठिकाणी जावून मोहिमेचा आढावा घेतला. त्यांनी शहापूर तालुक्यातील गोठेघर आश्रमशाळा, अंदाड माध्यमिक शाळेला भेटी दिल्या.

अमेरिकेच्या असणाऱ्या डॉ. कोलीन या दोन दिवस जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक भीमनवार यांची भेट घेवून या मोहिमेच्या नियोजना विषयी  सविस्तर चर्चा केली. त्यानंतर त्यांनी  ग्रामीण भागात जाऊन  मोहीम कसा प्रकारे राबवली जात आहे याची प्रत्येक्ष पाहणी केली. या पाहणी दरम्यान त्यांनी समाधान व्यक्त केले. त्यांच्या सोबत डॉ. महेश नगरे, डॉ. किशोर चव्हाण उपस्थित होते.

27 नोव्हेंबर 2018 पासून हि मोहीम राबवण्यात येत आहे. जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील 9 महिने ते 15 वर्षाच्या 4 लाख 98 हजार बालकांना ही लस इंजेक्शनच्या माध्यमातून देण्यात येत आहे. गेल्या सहा दिवसात 1 लाख 16 हजार बालकांना लस देण्यात आल्याची माहिती डॉ. मनिष रेंघे यांनी दिली.

